# प्रकरण चौथे

## अखंडादि काव्यांतील विचार आणि काव्यसौंदर्य

## प्रकरण ४ थे : अखंड-काव्य सौंदर्य । विचार सौंदर्य

### प्रस्तावना -

जोतिराव फुल्यांचे काव्य प्राचीन व अर्वाचीन काव्याच्या सीमारेषेवर असल्याचे आढळते. त्यांच्या काव्यरचनेवर एकनाथ, तुकाराम, रामदास यासारख्या संतकवींचा चांगलाच प्रभाव पडला. त्यांनी संतवाङ्‌मयाचा मनापासून अभ्यास केला. समाजप्रबोधनासाठी संतानी अवलंबलेला सनदशीर मार्ग फुल्यांना योग्य वाटला. संतकाव्याबरोबरच मिल्, पेन्सर, मेकॉले, कार्लमार्क्स् यांची विचारसरणी त्यांना पटलेली होती. थॉमस पेनच्या " Rights of man " या ग्रंथामुळे फुलेंना प्रेरणा मिळाली. या सर्वातून फुलेंनी सनदशीर मार्गाने समाज-प्रबोधन करण्यासाठी संतवाङ्‌मयास साधर्म्यदर्शक "अखंड" रचना केली. संतकाव्य सामान्यजनांच्या आध्यात्मिक उध्दारासाठी निर्माण झाले तर जोतिराव फुल्यांनी शूद्रातिशूद्रांच्या ऐहिक उध्दारासाठी आपली अखंडादि काव्यरचना केली. मराठी काव्याच्या परंपरेत समाजप्रबोधनवादी पण उपेक्षित समजल्या जाणाऱ्या जोतिराव फुल्यांनी आपल्या काव्यरचनेच्या माध्यमाने प्रक्षोभक भूमिका मांडली. सर्वसामान्य शूद्रातिशूद्र जनतेस स्वाभिमानाचे धडे शिकविलेच पण हजारोवर्षे चालत आलेल्या जाचक रूढी परंपरा शब्दांच्या माऱ्यांनी मोडून काढण्याचा प्रयत्न केला. उच्चवर्णीयांच्या मर्मावर आसूडाचे फटकारे मारले आणि आपल्या ध्येयपूर्तीसाठी धैर्याने उभे राहिले. त्यांच्या काव्याचा विषयच वेगळा होता. संतानी अभंगरचनेतून समाजातील दंभावर टीका केली तर फुल्यांनी अभंगाप्रमाणेच "अखंड" रचना करून जाचक रूढी परंपरा मोडून काढण्याचा प्रयत्न केला.

### अखंडरचना - वेगळेपणा-

मराठी काव्यपरंपरेच्या तुलनेने जोतिरावांची कविता वेगळीच होती. त्यांनी परमेश्वरविषयक, विपरित कल्पना, खुळचट धर्मकल्पना, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारली. आपले नकाराचे तत्वज्ञान "अखंडरचनेत" समाविष्ट केले.

SHRI. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

२

तत्कालीन समाजरचनेचा फुल्यावर चांगलाच प्रभाव पडला होता. समाजातील वर्णव्यवस्था अन्याय जुलूम यातूनच त्यांनी काव्यनिर्मितीची प्रखर प्रेरणा मिळाली. "मानवी स्वातंत्र्य" हाच त्यांच्या काव्याचा विषय होता. जे मानव नीतिनी पाळीत नाहीत त्यांच्यावर त्यांनी कठोर हल्ला केला. ब्राह्मणी नीतीच्या विरुध्द त्यांनी बंड पुकारले होते. म्हणूनच त्यांना आधुनिक महाराष्ट्राचा पहिला विद्रोही कवी म्हणता येईल. त्यांच्या काव्यामध्ये काव्यगुणांचा अभाव जाणवेल पण त्यातील धगधगता आवेश प्रकर्षाने जाणवतो. जोतिरावांच्या अखंडरचनेने वेगळेच वळण धारण केले होते.

जोतिरावांचे काव्य गद्यप्राय, ओबडधोबड पण स्वतंत्र आणि जळजळीत आत्मविष्काराचे प्रत्ययकारी प्रकटीकरण होय. "जे ग्रहणशक्तीवर ताण पडू न देता अंत:करणास रमविते ते काव्य" ही म.मो.कुंटेची काव्यविषयक व्याख्या जोतिरावांच्या काव्यास सार्थ ठरते. फुल्यांच्या काव्याचा विषयच वेगळा आहे त्यांना सालंकृत संस्कृतमिश्र मराठीकाव्य निर्माण करुन थोर पंडितकवींच्या मालिकेत स्थान मिळवायचे नव्हते. "त्यांची कविता संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी वर्णिलेल्या वेगवेगळया काव्यहेतूमध्ये बसण्याजोगी नक्की नव्हती. "यशसे अर्थकृते इ.काव्यशास्त्रकारांच्या वचनाप्रमाणे कीर्ति, द्रव्यलाभ किंवा मुक्तीसाठी जोतिरावांनी आपली काव्यरचना खचितच केलेली नव्हती."[१] तर उच्चवर्णीयांकडून भरडल्या जाणाऱ्या समाजास जागृत करुन स्वाभिमानाने जीवन जगण्याचा संदेश आपल्या काव्यातून त्यांना द्यावयाचा होता.

प्राचीन कवितेचा गाभा इथून-तिथून भारतीयच आहे. त्यामध्ये आध्यात्मिक उध्दार, भागवतादि पौराणिक धर्मग्रंथाचे रुपांतरण आढळते. तर आधुनिक कवितेवर इंग्रजी संस्कृतीची विलक्षण छाप आढळते. इंग्रजी काव्याच्या सहाय्याने हळूहळू मराठी कवितेचा ओघ बदलण्याचे कार्य नवशिक्षितांनी व लोककवींनी केले. आपल्या असंख्य देशबांधवाचे दु:ख, दैन्य, दास्य, दारिद्र्य व दारुण दुर्दशा पाहून लोककवींचे अंत:करण द्रवले होते. जोतिराव फुल्यांचा समावेश या लोककवीमध्येच केला जातो. त्यांच्या काव्याची पारख साहित्य-शास्त्राच्या निकषांवर करण्याची आवश्यकता नाही. जोतिरावांच्या कवितेचे

३

मूल्यमापन, तिच्यातील सामाजिक आशय, लोकाभिमुख दृष्टी व समाजावर पडलेला प्रभाव या कसोटयावर करणे योग्य वाटते.

फुलेंच्या काव्याचा विषय :

जोतिराव फुल्यांनी अभंग, अखंड, पोवाडे, आरत्या, मंगलाष्टके, यासारख्या काव्यप्रकाराचा अवलंब करुन अनेक विषयांना स्पर्श केला आहे. त्यांच्या सर्व काव्यप्रकारातून "समाजप्रबोधन आणि अन्याय निर्मूलन" या एकमेव तत्वाचा उद्घोष झाल्याचे प्रकर्षाने जाणवते. महाराष्ट्रातील सर्जनशील समाजक्रांतीचे ते खरे-खुरे "निर्मिक" होते. समाजक्रांतीच्या उर्मीतून आणि प्रेरणेतूनच त्यांच्या काव्याने जन्म घेतला. जोतिराव फुल्यांनी सर्वकष क्रांतीचे तत्वज्ञान असे आपल्या गद्य लेखनातून मांडले तसेच तत्वज्ञान अधिक प्रभावी होण्यासाठी काव्याचा अवलंब केला. मानवाच्या मुक्तिचे तत्वज्ञान हा त्यांच्या काव्याचा खरा विषय होय.

उपदेश :

फुलेंच्या अखंड रचनेत शुद्रातिशुद्रांसाठी उपदेश, ब्राह्मण आणि त्यांच्या ग्रंथप्रामाण्यावर जबर हल्ला, यांचा समावेश होतो. उपदेशवाणीतून शुद्रांना आत्मस्थितीची जाणीव करुन दिली. गुलामाला गुलामीची जाणीव करुन दिली, तर त्यांचा स्वाभिमान जागृत होऊन तो बंड करुन उठू शकतो, असा आत्मविश्वास जोतिरावांच्या अंतःकरणात होता. शुद्रांच्या मुलभूत मानवी हक्काची फुल्यांनी जाणीव करुन दिली. सर्व मानवांचा "निर्मिक" एकच आहे. याबाबतचा समतावाद मांडताना ते म्हणतात -

धर्मराज्य भेद मानवा नसावे ।।
सत्याने वर्तावे ।। ईशासाठी ।।
न्यायाने वस्तूंचा उपभोग घ्यावा ।।
आनंद करावा ।। भांडू नये ।।

जोतिराव फुल्यांच्या या विधानात्मक स्वरूपाच्या पद्यपंगतीमधून सर्व मानव-जातीसमोर समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्वाचे अनमोल तत्वज्ञान विनयशीलतेने मांडले आहे. शूद्रांवर होणाऱ्या अन्यायाबाबतची फुल्यांची सहनशीलता संपलेली होती. म्हणूनच काही ठिकाणी संतप्तवृत्तीने ते शिवराळ, अश्लील भाषा वापरतात पण तत्पूर्वीची त्यांची विनयशीलवृत्ती व समाजाच्या दु:खाविषयीचे कारुण्य "सर्वसुखी व्हावे भिक्षा मी मागतो । आर्यास सांगतो जोती म्हणे." यातून त्यांची सौजन्यशीलवृत्ती व समाजाविषयीच्या कळवळा, विश्वबंधुत्वाची विशाल दृष्टी लक्षात येते.

उच्चवर्णीयांनी हेतुपुरस्सर शूद्रांना अज्ञानाच्या अंधारात ठेवण्यासाठी शिक्षणापासून वंचीत केले. पण "अविद्या" हे शूद्रातिशूद्रांच्या व्याधीचे मूळ कारण होय हे त्यांनी शोधून काढले. विद्या संपादन केल्याने "शूद्र" हा शूद्र राहणारच नाही. यासाठी त्यांना भिक्षा मागावी लागली तरी चालेल पण विद्या संपादन करावी असा उपदेश करतात. उच्चवर्णीयांनी त्यांच्यावरील शिक्षणाची बंदी उठवावी व सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली करावीत ... अशी मनीषा प्रकट केली. सर्वांना लेखन स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य मिळावे. उच्चवर्णीयांनी आपले अल्पसे बुध्दिवैभव, परंपरेने मिळालेले मोठेपण थोडेसे बाजूला ठेऊन शूद्रांना बंधुभावाने वागणूक द्यावी ही फुल्यांची आंतरिक तळमळ होती. याची दखल न घेताच त्यांच्या उलट ब्रह्मद्वेष्टा, धर्मद्रोही, शूद्रजगद्गुरू, म्हसोबाभक्त, अज्ञानपालक यासारख्या "चोरांच्या उलटया बोंबा" मुळे त्यांचा राग अनावर होई व भावनेच्या भरात त्यांचे काव्य प्रक्षोभक व आक्रमक रूप धारण करू लागले.

जोतिराव फुल्यांना कोरडे पांडित्य मान्य नव्हते. उक्ती आणि कृतीची सांगड घालण्याचा ते खूप वेळा प्रयत्न करीत. सर्व मानवजातीने बंधुभावाने वागावे. याबाबत त्यांच्या मनात जी कळकळ होती त्याचप्रमाणे "स्त्रीपुरूष समानतेबद्दल जोतिबांना जिव्हाळा वाटत होता."[2] पुरूषवर्ग, स्त्रियांना शूद्र समजून अनेक मर्यादा व जखडत्या बंधनानी बांधून टाकतात. अर्थात स्त्रियांबाबत पुरूषांची ही अमानुष वृत्ती होय. म्हणून स्त्री-पुरूष समानतेबाबत "मानवी स्त्रीपुरूष"

असा फुले उल्लेख करतात. त्यांच्या काव्यरचनेतून स्त्रिदाक्षिण्य-वृत्ती जाणवते. त्यांनी स्त्रियांबाबतचे आपले विचार मुलींच्या शाळा, विधवा विवाह, बालहत्या "प्रतिबंधगृह" या रूपाने प्रत्यक्ष कृतीत आणून दाखविले. बहुजन समाजास उपदेश करीत करीत त्यांनी जी तत्वप्रणाली निर्माण केली ती जणू मानवजातीस आदर्श बनविणारी आधुनिक आचारसंहिताच होय.

## आचार संहिता -

अखंडरचनेतून जोतिरावांनी मानवाच्या सत्याचरणाची महान आचार संहिता मांडली आहे. सत्यनिष्ठा, न्याय आणि शिष्टाचार यांची आपल्या आचरणात सांगड घालण्याचे तत्व जोतिरावांनी सांगितले. सम्राट अकबरने हीच कामगिरी चालवली होती. त्यांच्या कर्तृत्वाचा उल्लेख करताना चतुरसेन म्हणतात -

"सम्राट अकबरने दीनेइलाही अथवा सार्वजनिक धर्म की नींव रखी । उसने सहस्त्रवर्षोंकी पुरानी प्रथा को बंद कर दिया, अनिच्छित वैधव्य, बालविवाह सती प्रथाको रोकनेकी भारी चेष्टा की ।[3] " सम्राट अकबर सारख्या लोकांचा आदर्श जोतिरावांनी घेतला. समाजाच्या सर्वांगिण सुधारणेसाठी पद्यमय स्वरूपाची आचार संहिता मांडली. नीतिमत्ता, धैर्यशीलता, सहिष्णूता, समाधानीवृत्ती, सद्‌विवेकादि गुणांचा अंगीकार करण्याबाबतचे आपले विचार सर्वसामान्यावर बिंबविले, शिवाय शुद्रांवर केला जाणारा गलिच्छपणाचा आरोप नष्ट करण्यासाठी त्यांना स्वच्छता, गृहकार्यदक्षता-बाबतही बाळकडू पाजले. जणू सर्व शुद्रसमाजाचा हा महात्मा एक "पालक" म्हणूनच भूमिका बजावित होता. अर्थातच 'प्रभाकर पाध्ये' सारखे विचारवंत त्यांचा " अज्ञान पालक' म्हणून कुचेष्टेने संबोध करीत. पण जोतिराव त्यांच्या टीकेमुळे कधीही ढळले नाहीत. शुद्रातिशुद्रांची सर्वांगीण सुधारणा हे त्यांचे जीवन ध्येय होते.

## "अखंड" अभिव्यक्ती -

जोतिराव फुल्यांच्या काव्यातील अभिव्यक्ती वाचकाचे अंत:करणास स्पर्श करणारी आहे. संतकाव्याच्या चिकित्सेमुळे अखंडरचनेतील अभिव्यक्तीस सामर्थ्य प्राप्त झाले. अर्थातच अखंडादि रचनेतील प्रत्ययकारी प्रकटीकरणास

कारणीभूत असणा-या संतकाव्याची तुलनात्मक चिकित्सा करणे उचित वाटते. संत कबीर, नामदेव, तुकाराम, रामदास यांचे काव्यतंत्र व विचार फुलेंच्या काव्यातील परखड अभिव्यक्तीस पोषक ठरले.

संत कबीर आणि फुले :

पंधराव्या शतकातील कबीर-कालीन सामाजिक परिस्थिती भयानक होती. तत्कालीन सुलतानी राज्यव्यवस्था क्रूर आणि धर्मांध होती. फिरोजशहा तुगलकाच्या कारकिर्दीत तर ब्राह्मणाचाही छळ केला जात होता. त्यांच्यावर राजकीय दबाव आणून हिंदुधर्माबाबत महती गाणारे उच्चवर्णीयांचे तोंड कायमचे बंद केले होते. याबाबत ब्रह्मदत्त शर्मा म्हणतात -

" ब्राहमणोंपर पॉल टेक्स लगाया गया और अनसे अपने धर्म को श्रेष्ठ कहनेका भी अधिकार छीन लिया गया ।[४] " याप्रमाणे हिंदुधर्मियांची प्रचंड मोठी आबाळ झाली. काही समाजसुधारकांना जिवंत जाळण्यात आले. तत्कालीन सिंहासनारूढ "सिंकदर लोदी" ने एकवेळ महाकवी कबीरांना शासन करण्याचे ठरविले होते. सर्वत्रच अनाचार, अत्याचार, भ्रष्टता, दारिद्र्य, अशांती, निराशाचे साम्राज्य पसरले होते. वर्णव्यवस्था व जातिभेद जन्मानुसार पुर्वापार चालत आले होतेच. यावनी लोकांकडून हिंदुधर्मियांचे उध्वस्तीकरण झाले तरी त्यांच्यात ऐक्य नव्हते. ब्राहमण-समाज शुद्रांना स्पर्श करणे विटाळ मानीत होता. पुरोहितशाहीमध्ये भोंदूगिरीने शिरकाव केला होता. हिंदु-मुस्लीम वैर पराकोटीस गेले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये संत कबीर यांनी धैर्याने समाजप्रबोधनास प्रारंभ केला. समाजातील काही लोकांकडून त्यांचाही छळ केला जात असताना संत कबीरदासजीप्रमाणे फुल्यांनीही धैर्याने आपले कार्य अखंडपणे चालविले होते. कबीरांच्या कालखंडातील रामानंद, जायसीसारख्या संतानी जनजागृती व समाजप्रबोधनाचे व्रत धारण केले.

कबीरदासजींनी हिंदु-मुस्लीम धर्मभेद नष्ट करून विशुध्द मानवतावादी सिध्दांत मांडला. सर्वांचा एकच "मानवधर्म" स्थापन केला. समाजात बंधुभाव

७

निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. धर्म आणि समाजाच्या आधुनिकीकरणासाठी नवक्रांतीचा संदेश दिला. अर्थातच समाजातील पददलित शूद्र निराश्रीत असंख्य लोकांनी संत कबीरदासजींचे नेतृत्व स्वीकारले. जोतिराव फुलेंचेंही समाजातील असंख्य शूद्रातिशूद्रांनी नेतृत्व स्वीकारले. कबीरांनी आपल्या पद्य रचनेतून भोंदूगिरीवर टीका व सत्याचरणाची तत्वप्रणाली सांगितली. जोतिराव फुल्यांनी कबीरदासजींचे काव्य बारकाईने अभ्यासले. त्यांच्या "बीजक" ग्रंथातील तत्वज्ञान समाजास सांगितले. समाजप्रबोधनासाठी काव्याचा अवलंब केला. त्यांनी समाजातील जाचक धर्मतत्वांचे आधुनिकीकरण करून नवीन आचारसंहिता मांडली. कबीरदासजीप्रमाणे फुल्यांनी प्रथम समाजातील भ्रष्ट आचरणावर परखड टीका करून सत्याचरणाचे धडे दिले. कबीरांनी मूर्तिपूजेचे आवडंबर धर्माभिमान परस्त्रीगमनादि व्यभिचाराचे समूळ उच्चाटन केले. जन्मानुसार जाति-धर्म मानणाऱ्या ब्राह्मणांवर परखड टीका करताना कबीर म्हणतात -

जो तू ब्राहमण बाम्हनी जाया T
आन बाठ पे क्यूं नही आया T [५]

ज्या ब्राहमणीपासून उच्चवर्णीयांनी जन्म घेतला. त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी मातेपासून जन्म घेतला. अर्थातच सर्वांचा जन्म स्त्री-जातीपासून झाला. सर्वांची एकच मानवजात मानण्याऐवजी ब्राहमण स्वत:स उच्चवर्णीय का मानतात ? त्यांचा जन्म मानवी जन्मापेक्षा वेगळ्या मार्गाने झाला काय ? तसेच कबीरांनी अस्पृश्यता मानणाऱ्या ब्राहमणांना ठामपणे प्रश्न विचारला -

तुम्ह कैसे ब्राहमण पांडे हम कैसे शूद्र T
छोति छोति करत तुम्हही जाए T
तो गर्भवास काहे को आए T [६]

कबीर दासजींनी ज्याप्रमाणे ब्राहमणांना हा प्रश्न विचारला त्याचप्रमाणे फुल्यांनीही रोखठोक सवाल विचारला ते म्हणतात -

आर्य कसे धनी, शुद्र का हो दास ?
शोधा कृत्रिमास वेळ हीच.

कबीरदासजींच्या काव्यात परखडपणाच्या आवेशाला मर्यादा आहे, पण फुलेंचा आवेश मात्र अमर्याद वाटतो.

कबीरदासांनी आपल्या काव्यातून जातीभेद निर्मुलनाबाबतची तत्वप्रणाली मांडली. ते म्हणतात -

" जाति पांति पूछे नही कोई
हरी को भजैं सौ हरि का होई । [७]

जातिभेद निर्मुलनाच्या तत्वज्ञानाबरोबरच मानवास सत्याचरणासाठी आवश्यक असणाऱ्या दया, धैर्य, उदारता, चारित्र्य, संतोष, दीनता आणि सत्यता इत्यादि सद्गुणांचा अवलंब करण्याबद्दल उपदेश केला. जोतिराव फुल्यांनी आपल्या अखंड रचनेतूनही सत्याचरणाबाबतची नवीन आचार संहिता समाजासमोर मांडली. कबीरदासजीप्रमाणेच एकनाथ, तुकारामादिंच्या काव्याचाही फुल्यांच्या अखंडरचनेवर प्रभाव पडलेला आढळतो.

## एकनाथ आणि फुले -

संत वाङ्मय पूर्णत: समाजाच्या उन्नतीकरिता निर्माण झाले असल्यामुळे समाजातील दंभावर, धर्माच्या नावावर चाललेल्या विषमतेवर, उच्चवर्णीयांच्या स्वार्थावर सर्वच संतानी टीका केली. संत एकनाथांनीही आपल्या काव्यातून समाजातील दंभावर सडेतोड टीका केली. तत्कालीन धार्मिक क्षेत्रात अनेक प्रकारची सोंगे ढोंगे माजवून परमार्थाचा बाजार भरवू पाहणाऱ्या दांभिकांच्या स्वार्थी वृत्तीला ऊत आला होता. विशेषत: ब्राह्मणांची भोंदूगिरी राजरोसपणे चालली होती. याबाबत एकनाथ म्हणतात -

न जागता देती आशीर्वचन ।
करिती नीचांचे सेवन ।
हाती यावया उपाध्येपण ।
दारी संमार्जन यजमानांच्या ।। [८]

कोरडे पांडित्य गाजविणा-या भोंदू ब्रह्म्यवृंदांना एकनाथ " केवळ जाणते दगड " म्हणून संबोधितात. या उच्चवर्णीयांची स्वत:स भूदेव समजून सर्व समाजव्यवस्था बिघडून टाकली तेच ब्राह्मण जोतिराव फुल्यांच्या टीकेचे लक्ष ठरले.

संत एकनाथांनी लोकोध्दारासाठी "भारूड" या काव्यप्रकाराचा अवलंब केला. साध्या सोप्या भाषाशैलीत समाजातील चालीरितीवर टीका केली. मनोरंजनातून बोध करून समाजप्रबोधनाचे कार्य आरंभिले. फुल्यांची काव्यरचना भारूडाप्रमाणेच आढळते. पण त्यामध्ये लोकांच्या आध्यात्मिक उध्दाराऐवजी केवळ ऐहिक उध्दारास प्राधान्य दिले आहे. एकनाथांनी दोन्ही साधण्याचा प्रयत्न केला आहे. नाथांनी त्यास विनोदाची झालर दिली पण शूद्रातिशूद्रांचा अनन्वित छळ करणा-या उच्चवर्णीयांबाबत जोतिराव फुल्यांच्या मनात तीव्र संताप होता. संताच्या कार्याप्रमाणे सनदशीर मार्गाने समाजप्रबोधन करण्याचे फुल्यांचे ध्येय होते पण काही वेळा त्याच्या अखंडरचनेत संतापाच्या भरात परखड-पणाची मर्यादा ओलांडली जाते व प्रक्षोभक रूप धारण करते.

संत एकनाथ हे त्यांच्या काळातील कर्ते सुधारक होते. वरिष्ठ वर्गाच्या रागालोभाची पर्वा न करता त्यांनी आपले समाजोध्दाराचे कार्य आजीव केले असे शं. दा. पेंडसेंचे मत सार्थ वाटते. नाथांना धर्मभेद जातिभेद मान्य नव्हता.

" हिंदू मुसलमान दोई । खुदाने पैदा किया भाई ।।"[९]

असे विचार मांडून धर्मभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी विश्वव्यापक ईश्वरभक्ती, समता, सदयता शांति, क्षमा यांचा पुरस्कार करणा-या "भागवत धर्माचा" अधिक प्रसार करण्याचे ठरविले. जोतिराव फुल्यांनी एकनाथांचा आदर्श डोळयापुढे

ठेऊन सर्वांसाठी सार्वजनिक सत्यधर्माच्या प्रसाराचे कार्य जोमाने चालविले होते. एकनाथांनी वर्णाश्रम पद्धतीच्या संदर्भात समाजात रुढ असणाऱ्या वेडगळ कल्पनांना विवेकशीलतेने धक्का दिला. एकनाथकालीन वर्णव्यवस्था जन्मावर अवलंबून होती. अर्थातच आवश्यक गुण नसूनही केवळ ब्राह्मण जातीत जन्मला म्हणून तो उच्चवर्णीय पंडित ठरला. या पोकळ अंहंकारामुळे वर्णसंस्थेचा अध:पात झाला म्हणून एकनाथ या परंपरेस धक्का देताना म्हणतात -

ज्याची जीविका जेणे जाण ।
तो त्याचा वर्ण ।। [१०]

व्यक्तीच्या व्यवसाय-कर्मानुसार त्याचा वर्ण ठरेल हे विचार त्या प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत धाडसाचे होते. पण कर्ता सुधारक या दृष्टीनी अनंत यातना सहन करीत. जातिभेद निर्मुलनाचे महान कार्य हाती घेतले . "मानवजाती" हीच आमची विश्वव्यापक जात आहे. ते म्हणतात -

आम्हां सोवळे ओवळे नाही ।
विटाळ न देखो कवणे ठाई ।।
आम्हां सोयरे जे जहाले ।।
यातिकुळा वेगळे केले ।
ऐका जनार्दनी बोध ।
यातिकुळींचा फिटला संबंध ।।

एकनाथांनी विश्वबंधुत्वाची कल्पना आपल्या काव्यरचनेतून मांडली. तुकाराम-रामदासांनी एकनाथांची परंपरा पुढे चालविली. जोतिराव फुल्यांनी हीच परंपरा पुढे गतिमान बनवली.

<u>तुकाराम आणि फुले -</u>

जोतिराव फुल्यांच्या "अखंडादि" काव्यरचनेवर तुकारामाच्या अभंगाचा चांगलाच प्रभाव पडला होता. तुकोबाच्या जीवनकार्याचा पाया संत एकनाथांनी

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

घातला होता. सतराव्या शतकातील सामाजिक परिस्थिती रूढी-परंपरांचा तुकारामांनी बारकाईने अभ्यास केला. मुंबाजी, सालोमालो सारख्या कर्मठ पंडितांकडून झालेला छळ, दाहक यातना त्यांनी सहन केल्या होत्या. धर्माच्या नावाखाली सामान्यांची होणारी पिळवणूक त्यांनी जवळून पाहिली होती. अशा परिस्थितीत तुकोबांनी धार्मिक व सामाजिक सुधारणेवर भर दिला. सामाजिक विषमतेवर जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठतेवर कडक टीका केली. धार्मिक थोतांड व ढोंगबाजीवर शिवराळ भाषेत प्रखर हल्ला केला. जोतिराव फुल्यांच्या अखंडरचनेतील संतापाच्या धगधगत्या आवेशाची ठिणगी तुकोबाच्या अभंग रचनेत होती.

समाजातील जाचक रूढी, परंपरा, धर्मतत्वानुसार सर्वसामान्य लोकांचा छळ करू पाहणा-या कर्मठ धर्मपंडितांना धैर्याने आव्हान करताना प्रथमतःच तुकोबा म्हणतात -

मऊ मेणाहूनि आम्ही विष्णूदास ।
कठिण वज्रास भेंदू ऐसे ।।
भले तरी देऊ कासेची लंगोटी ।
नाठाळाचे माथी देऊ काठी ।। [११]

त्यांच्या स्वभावात एक प्रकारचा परखडपणा असल्यामुळे लहानथोर न म्हणता किंवा कुणाची भीडभाड न धरता मेणाप्रमाणे मऊ असणारे तुकोबा दांभिकावर तुटून पडताना वज्राहूनही कठीण बनतो. तुकोबाच्या अभंग रचनेत थोडयाफार प्रमाणात अर्वाच्चपणा जाणवतो. समाजातील भोंदू ब्राह्मणावर टीका करताना ते म्हणतात -

ब्राह्मण तो नव्हे ऐसी ज्याची बुध्दि ।।
पाहा श्रुतीमधी विचारूनि ।।
जयासी नावडे हरि नामकीर्तन ।।
आणीक नर्तन वैष्णवांचे ।।
सत्य त्याचे वेळे घडला व्यभिचार ।
मातेशी व्यवहार अंत्यजाचा ।। [१२]

तुकोबा ब्राह्मणांवर व्यभिचाराचा रोखठोक आरोप करतात. जोतिराव फुले सुध्दा आपल्या अखंडादि काव्यातून संतापाच्या पोटी उच्चवर्णीयांवर अर्वाच्चभाषेत टीका करतात. त्यांची ही प्रक्षोभक वृत्ती पाहिली म्हणजे हे थोडे अती झाले की काय असे समाजातील पांढरपेशा वृत्तीच्या माणसांना वाटणे स्वाभाविक आहे. पण ज्या निर्घृणपणे शूद्रवर्णीयांशी ब्राह्मणी संस्कृतीने धर्माच्या नावाखाली हजारो वर्षे वर्तन केले. त्या संदर्भात फुल्यांचा हा प्रक्षोभक अविष्कार पाहिला तर तो अस्थानी नाही असे म्हणावेसे वाटते. फुल्यांपेक्षा तुकोबांचा पुरोहितशाहीबाबतचा प्रक्षोभ पराकोटीचा वाटतो. भोंदू ब्राह्मण जटा वाढवून समाजात वाट्टेल ती बडबड करीत असतात. लोकांना शकुनापशकुन सांगून अखंडपणे त्यांची लूट चालूच असते. शूद्रातिशूद्रांकडून द्रव्यलूट करून त्यांनाच अस्पृश्य मानणा-या ब्राह्मणाबाबत तुकाराम म्हणतात -

> महारासी शिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ।।
> तया प्रायश्चित कांही । देहत्याग करिता नाही ।। [१३]

शूद्रांबाबत तिरस्कार, विटाळ मानणा-या ब्राह्मणांवर जोतिरावांनीही संत तुकोबाप्रमाणे टीकेची झोड उठविली आहे. तुकोबानी आदर्श संत व सत्याचरणाबाबतची तत्वप्रणाली आपल्या अभंगातून सांगितली. त्यांचे समाजाशी असलेले नाते हे केवळ प्रासंगिक उपदेशापुरतेच होते. पीडित अशा लोकांच्या दर्शनाने त्यांचे अंत:करण कळवळत होते. समाजप्रबोधनासाठी त्यांची अखंड धडपड होतीच. पण त्यांनी यासाठी कधी तीर्थयात्रा केल्या नाहीत. शिष्यवर्गही राखला नाही. पंख मिटून बसलेल्या गरुडाप्रमाणे त्यांचे सामाजिक संबंध मिटलेले होते.[१४] जोतिराव फुल्यांचे मात्र समाजाशी असणारे नाते प्रासंगिक उपदेशापुरते नव्हते. तळागाळातील सर्वसामान्य समाज, शूद्रातिशूद्र स्वाभिमानाने जगावेत. ब्राह्मणांची भोंदूगिरी समूळ नष्ट व्हावी. यासाठी त्यांची अविरतपणे धडपड सुरु होती. संत वाङ्मयाने प्रभावित झालेल्या फुल्यांनी अखंडातूनसामान्य शूद्रातिशूद्रांना जागृत केले. रामदासांनीही जनजागृतीची मोहिम आपल्या काव्याद्वारे सुरु केली होती. रामदास व फुले यांच्या काव्यरचनेतही साम्य आढळते.

-३

रामदास आणि फुले :

समर्थ रामदास आणि जोतीराव फुलेंचे काव्य तुलनेने सर्वसामान्य लोकांना सुज्ञ करण्याच्या उद्देशाने निर्माण झाले. समर्थ रामदासांनी जवळजवळ बारावर्षे तीर्थयात्रा केली. तत्कालीन सामाजिक परिस्थिती, लोकजीवन बारकाईने न्याहाळले. समाजात सर्वत्र माजलेली बेबंदशाही, लोकांची अन्नान्न दशा, पिळवणूक, अन्याय यामुळे विव्हळण्यास देखील असमर्थ असलेल्या दुबळया असाहाय्य हिंदु समाजाच्या दर्शनाने समर्थ रामदासांचे मन उद्विग्न झाले. याबाबत समर्थ म्हणतात -

जन बुडाले बुडाले पोटेविण गेले ।
बहुत कष्टले कष्टले कितियेक मेले ।। [१५]

समर्थांना सर्वसामान्यांची चिंता लागून राहिली. जोतिराव सुध्दा अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या शूद्रातिशूद्रांवर होणाऱ्या अन्यायामुळे बैचैन होते. उच्चवर्णियांनी शूद्र समाजास गुलाम बनविले. शिक्षणापासून दूर ठेवले. धर्माच्या तत्वाखाली भरडून काढले. या पुरोहितशाहीसच फुल्यांनी सुरंग लावण्याचा प्रयत्न केला व शूद्रांच्या मुक्ततेसाठी जणू रणशिंग फुंकले.

रामदासांनी मात्र सुलतानी सत्तेमुळे विस्कटलेली समाजरचना सुस्थितीत येणेसाठी मोडकळीस आलेल्या वर्णाश्रमधर्माचा उध्दार केला. "लोकांनी वर्णधर्मप्रमाणे वागून आपले ऐहिक व पारलौकिक कल्याण साधावे [१६]" हा विचार सर्व समाजात त्यांनी तळमळीने पसरविला. वर्णाश्रमधर्माचा उध्दार म्हणजेच ब्राह्मणांनी अध्ययन-अध्यापन व इतरेजनांना स्वधर्माचे ज्ञान करुन द्यावे. क्षत्रियांनी दुष्टांना शासन करावे. वैश्यांनी व्यापार करावा. शूद्रांनी सेवा करावी. सर्व प्रजेचा राजा स्वधर्मीय क्षत्रिय असावा. राजाने सर्व वर्ण, आपली कर्तव्ये नीटपणे पार पाडताहेत की नाही पहावे. सदैव धर्मरक्षण करावे. इत्यादी प्रकारची तत्वप्रणाली समाजासमोर मांडली. पण हीच "वर्णाश्रमधर्मपध्दती"

जोतिरावांना मान्य नव्हती. शिवाय छत्रपती शिवाजीसारख्या महापराक्रमी राजास याच ब्रह्म्यवृदयांनी धर्माच्या नावाखाली लुबाडले. म्हणून फुले आपल्या काव्यात रामदासांवर टीका करतात. प्रा.गं.बा.सरदार व स.ज. भागवतही समर्थांवर टीका करताना म्हणतात - मानवी समतेच्या मार्गात ब्राह्मणांच्या कल्पनेची धोंड आणून सामाजिक प्रगतीचा गाडा मागे नेणारा रामदास हा प्रतिगामी संत होय. पण या विधानावर शं.गो. तुळपुळे आक्षेप घेऊन रामदास हे "समतावादीच" आहेत हे पटवून सांगतात.

रामदास इतर संताप्रमाणे समाजातील भोंदू लोकांवर दांभिकावर कडकपणे टीका करतात.

जिकडे तिकडे ज्ञानी जाले ।
उदंड गोसावी उतरले ।।
तयाचे संगतीने जाले बाष्कळ प्राणी ।।
कशापासूनि काय जाले । ब्रह्मांड कोणी निर्मिले ।
काही न कळताचि भुंकिले ।। गाढव जैसे । [१७]

समाजातील भोंदूगिरीस नष्ट करण्यासाठी व त्यांच्या सत्याचरणासाठी "मनाच्या श्लोकापासून" उपदेशाचे डोस पाजले आहेत. समर्थांनी सर्वजनांना शहाणे करून सोडण्यासाठी जे विचार मनात आले ते काव्यातून व्यक्त केले. फुल्यांनी समर्थांची काव्यशैली व तत्वप्रणाली थोडया प्रमाणात स्वीकारली. फुल्यांनंतर वलंगकरबाबा, कृष्णराव भालेकर यांनीही आपल्या काव्यातून जोतिरावांचे विचार समाजासमोर तितक्याच परखडपणे मांडले.

वलणकर बाबांचे "अखंड" -

गोपाळबाबा वलणकर हे महाड तालुक्यातील लोकल बोर्डाचे अस्पृश्य सभासद. फुल्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अखंडादि काव्यरचनेची परंपरा वलंगकर बाबांनी पुढे चालविली. जोतिरावांच्या अखंडरचनेप्रमाणे वलणकरांच्या

अखांडरचनेत परखाडपणाचा आवेश आढळतो. उच्चवर्णीय समजल्या जाणा-या ब्राह्मणांचे आचरण खा-या अर्थाने शूद्रांपेक्षाही किती हीन आहे ते त्यांनी साधार पटवून सांगितले आहे. ते म्हणतात –

हल्लीचे ब्राह्मण मानिती आपणा ।।
ऋषिवंश जाणा आम्ही असो ।
परि आर्य ऋषि होते जातिहीन ।
उत्पत्ती सांगे न शास्त्राधारे ।। [१८]

शास्त्राच्या आधारे वलंगकर सांगतात – पराशर ऋषीने अतिशूद्राच्या पोटी जन्म घेतला. व्यास कोळीणीपासून, सतीर महारणीपासून तर वसिष्टी वेश्येपासून जन्मला. ब्राह्मणांच्या धर्मावरच घाव घालण्याचा प्रयत्न वलंगकरांनी केला आहे.

उच्चवर्णीयांनी धर्माच्या नावाखाली चालविलेल्या पिळवणूकीबाबतही त्यांनी आवाज उठविला. इंग्रजी राजवटीत मिळालेल्या अधिकारशाहीच्या बळावर सर्वसामान्य शेतक-यांना लुबाडणा-या ब्राह्मणांबाबत इंग्रजराणीसमोर गा-हाणे गाताना ते म्हणतात –

घेवूनिया फंड । शेतसा-यापासून ।।
भलत्यास धन । देतीस तू ।।
विद्येच्या नावाने । मागे आधी पट्टी ।
नाही कधी सुट्टी । वसूलाची ।। [१९]

शेतक-यांकडून विद्येच्या नावाने कर वसूल केला जातो. पण त्यांना हा उच्चवर्णीय समाज शिक्षणापासून वंचीतच ठेवतो. शेतक-यांवरील अन्याय दूर करा. यामुळे खा-या अर्थाने "इंग्रजी राज्याची बढती होईल" असा विचार मांडतात. समाजात विधवा स्त्रियांची उच्चवर्णीयांकडून होणारी कुचंबणा पाहून बाबा म्हणतात –

विधवा विटंबना ऐकूनिया कानी । दया न ये मनी कठोरांच्या
आया, बहिणी, लेकी आणीक सुना । आक्रोषिती जाणा येणू परी ।।
खाटिकाच्या घरी दुष्ट हा नापीत । भाद्राया तिष्ठित डोकी त्यांची ।। [२०]

जोतिराव फुल्याप्रमाणे वलणकरबाबांची स्त्री-दाक्षिण्य वृत्ती लक्षात येते. समाजातील शेतकरी, शुद्रातिशुद्रांची उच्चवर्णीयांच्या गुलामगिरीतून मुक्तता होण्यासाठी वलणकरबाबा अखेर ईश्वराकडे धाव घेतात व म्हणतात -

नमन देवाला । करितो मी आधी ।
व्हावे प्रतिवादी । भूदेवाचे ।।
नको तो विलंब । देई मती देवा ।
कळू दे रे कावा । लबाडाचा ।।

जोतिराव फुल्यांनी सत्यदेवतेची आळवणी करुन आपली आंतरिक वेदना व्यक्त केली. त्याचप्रमाणे बलणकरबाबाही आपल्या विवंचनेचे गाऱ्हाणे ईश्वरासमोर मांडतात. धोंडिराम नामदेव " नावाचे सत्यशोधक समाजीयन "दीनबंधु" अंकातून ब्राह्मणांच्या आचरणावर परखड टीका करतात व ईश्वराकडे तक्रार करतात.

हर हर हे ईश्वरा हया हिंदुस्थानी ।
संकटात काळ काटला अतिशुद्रांनी ।।

ईश्वराजवळ आपला दु:खावेग व्यक्त करुन सर्व शुद्रातिशुद्रांना ब्राह्मणांचे ब्रह्मकपट बाहेर काढण्याबाबत संघर्षाची प्रेरणा देतात. कृष्णराव भालेकरांनीही अभंग, लावण्या, पोवाडे, श्रीखंड या सारख्या काव्यातून उच्चवर्णीयांचे वर्चस्व व शुद्रातिशुद्रांची पिळवणूक व्यक्त केली आहे.

## कृष्णराव भालेकरांची "श्रीखंड" रचना -

कृष्णराव भालेकरांची दीनमित्राच्या सन १८८८ मधील पहिल्या पाच अंकातून "श्रीखंड" ही फुल्यांच्या अखंड सादृश्य काव्यरचना केली. समाजास सत्याचरणाबाबत आदर्श आचार संहिता ज्याप्रमाणे फुल्यांनी अखंडाद्वारे

मांडली त्याचेच अनुकरण येथे आढळते. मानवाने समाजात स्वाभिमानाने जीवन जगावे, ज्ञानसंपन्न व गुणसंपन्न होण्याचा प्रयत्न करावा, त्याचे आचरण शुध्द असावे, व्यसनापासून अलिप्त रहावे, आपल्या कार्याशी व उद्योगाशी एकनिष्ठ असावे, सोवळे, ओवळे, वर्णभेद मानू नये. "मानवजात" हीच एकमेव सर्वांची जात असावी. याबाबत ते म्हणतात -

जोवर नाही एक जाती ।
तोवर संकटे न जाती ।
एक धर्म सर्व वागू ऐसे ।
ईहवादया सांगू । [२१]

सर्वांचा एकच धर्म असावा. समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्वासाठी सर्वांनी झटावे. तरच सर्वत्र सुख-समृध्दीचे अधिराज्य पसरेल. "श्रीखंड" या काव्य प्रकारातून भालेकरांनी जोतिरावांप्रमाणे आदर्श आचारसंहितेचे विचार मांडले.

जोतिराव फुल्यांच्या अखंडादि काव्यातील अभिव्यक्तीवर संतवाङ्:मयाचा प्रभाव पडला होता. वलणकर, भालेकरादिंनी त्यांची काव्यपरंपरा त्याच आवेशापूर्ण अभिव्यक्तीने चालविली. पण फुलेच्या अखंडादि रचनेतील ब्राह्मणा-वरील परखाडपणा आवेश प्रक्षोभक व आक्रमक स्वरूपाचा होता. ब्राह्मणाच्या प्रतिटीकेमुळे संतप्त झालेले जोतिराव रागाच्या भरात ब्राह्मणी टीकेची खूपवेळा पुनरावृत्ती करतात. पण या परखाडपणातून त्यांचा धगधगता आवेश प्रकर्षाने जाणवतो. हे त्यांच्या अखंडरचनेचे वैशिष्ट मानावे लागेल.

ब्राह्मण्य टीका - परखाडपणा -

जोतिराव फुल्यांनी शूद्रांमध्ये वैचारिक क्रांती घडवून आणण्यासाठी काव्यमय स्वरूपाची आचारसंहिता "अखंड" रचनेत समाविष्ट केली. शिवाय ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्वाविरुध्द लढा उभारून ब्रह्मवृदांवर परखड टीका केली. फुल्यांनी इतिहास पुराण काळातील कछ-मछ-वराह, वामन, परशुरामादि इराणी

आर्यांपासून ते शिवकालीन गागाभट्ट पेशवाई आंग्लाइतील उच्चवर्णीय ते खुद्द फुल्यांच्या काळापर्यंत सर्व भट-ब्राह्मणांच्या दुष्कृत्याचा पाढा वाचायला आहे. जातिसंस्थेबाबत डॉ. सुमंत मुरंजन यांच्या मताला पुष्टी देताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात -

जातिसंस्था ही पुरोहितवर्ग-वर्चस्वामुळेच दीर्घकाळ आतापर्यंत हजारो वर्षे स्थिरावली हे डॉ. मुरंजन यांचे मत निःसंशय ग्राह्य होय.[२२] या जातिभेदामुळेच हीन गणल्या गेलेल्या शूद्रातिशूद्रांना उच्चवर्णीयांकडून होणारा अमानवी छळ सहन करावा लागला. कल्पनेने निर्माण केलेल्या भ्रामक धर्मतत्वाच्या नावाखाली समाजाची धार्मिक विधीच्या निमित्ताने अगणित द्रव्यलूट केली. पुरोहितशाहीच्या या दुष्कृत्यामुळे जोतिरावांनी त्यांच्यावर ग्रामीण शैलीमध्ये प्रखर व सडेतोडपणे शिवराळ भाषेत टीका केली. ही टीका साधारणपणे दोन प्रकारची आहे.

[१] ब्रिटिश शासनातील कारकून, प्रशासक असलेल्या ब्राह्मणवर्गाने आपल्या हाती असलेल्या मर्यादित सत्तेचा दुरुपयोग करुन सामान्यांना नागविले ते जोतिरावांनी सर्वांना पटवून दिले.

[२] धार्मिक वर्चस्व माजविणा-या ब्राह्मणवर्गाने शूद्रातिशूद्रांचे शोषण कशा पध्दतीने चालविले आहे हे सामान्यांना दाखवून दिले.

पैकी पहिला भाग फुल्यांना लोकमानसात चांगल्या प्रकारे बिंबवता आला पण दुस-या भागातील पुरोहितांचे धार्मिक विचार व अधिकार नाकारणे ही बाब मात्र लोकमतांवर तितकीशी प्रभावीपणे बिंबवता आली नाही. कारण " धार्मिक विधि-संस्काराचे निर्णायक अधिकार केवळ पुरोहितवर्गाकडेच आहेत" या अज्ञानात रुजलेल्या समजुतीला समूळ व चटकन नष्ट करणे अवघड होते. म्हणूनच धार्मिक सत्तेचा बुरुज कोसळून टाकण्याची ईर्षा फुल्यांच्या मनात तीव्रतेने बळावत गेली.[२३] अर्थातच हळूहळू त्यांच्या परखडपणास धार आली. काही ठिकाणी त्यांची मर्यादा सुटते व क्रोधाने उच्चवर्णीयांच्या आचरणाबाबत म्हणतात -

सोमरस दारू यज्ञी भट पिती ।।
गाई मांस खाती ।। हाय हाय ।।
धूर्तभट शास्त्री निलाजरे होती ।।
खोटे लेख देती ।। हाय हाय ।। [२४]

उच्चवर्णीयांना याप्रमाणे निलाजरा, पाखांडी, कृतघ्न, तट्टू गुलजार, भिकमाग्या, पुराचारी, दुष्ट, मतलबी, नकटा, वाटोळा, गुन्हेगार, धर्मलंड, भ्याड, ग्रामराक्षस, नाम्या, चांडाळे, नीच उचल्या, लुटारू, जगद्वेष्टे, अडबंका अशी अनेक विशेषणे लावून जणू त्यांच्यावर शिव्यांची लाखोली वाहिली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या स्त्रियांवरही टीका केली आहे. याबाबत फुले म्हणतात -

भटणीचा इंगा विचारी दावीदा ।।
काममोर गदा ।। करी चेंदा ।।
भटणीला आहे कंचुकी सोरट ।। [२५]

जोतिरावांनी अखंडरचनेतही आपली मर्यादा सोडून परखडपणे ब्राह्मणांवर शिवराळ भाषेत टीकेचा वर्षाव केला आहे. याबाबत आक्षेप घेताना चिं.ग.अनेक म्हणतात -

" ब्राह्मणांना दिलेल्या शिव्या हे फुल्यांच्या अत्यंत कुजक्या मनोवृत्तीचे लक्षण आहे. त्याच त्याच शिव्या, तेच तेच आरोप तीच तीच दुष्कृत्यांची क्रौर्याची वर्णने एवढेच त्यांचे भांडवल होय " [२६]

जोतिरावांच्या गद्य, पद्यादि वाङ्मयात विशिष्ट ब्राह्मणवर्गावर शिवराळ भाषेत अमर्याद टीका केली हे खरे आहे. पण ब्राह्मणवर्गाप्रमाणेच गणपती, हनुमान, कृष्ण, विठ्ठल यासारख्या देवादिदेवांवर टीका केली आहे. रामदास, ज्ञानेश्वरादि पूजनीय व्यक्तीही त्यांच्या टीकेस बळी पडले आहेत. यावरूनच हजारो वर्षे शूद्रातिशूद्रांच्या अन्यायाबाबतचा त्यांच्या मनातील जळफळाट लक्षात येतो.

देवदेवतांवरील टीका -

जोतिराव फुले ऐकेश्वरवादी होते. ईश्वरावर त्यांची श्रध्दा होती. पण ईश्वराच्या नावाखाली सामान्यांची लूट करणाऱ्या भक्त-पुजारी, देवदेवतांसह त्यांच्या मनात संताप होता. गणपतीसारख्या आराध्य दैवतासही चिखलतुडवून बनविलेला ढंबूढेऱ्या, ग्रंथातील एक सोंग, सोंडेतून सेंबूड फुंकणारा, अंत्यज व भट यामध्ये भेद मानणारा अशा भाषेत टीका केली आहे. तर श्रीकृष्णाबाबतही फुल्यांनी परखड टीका केली. "कृष्ण" हे दैवत उच्चवर्णीयांनी कल्पनेने रंगविलेले थोतांड आहे. हा "काळाकृष्ण दह्या-दुधाच्या चोऱ्यामाऱ्या करुन सोळा सहस्त्र एकशात अष्ट नारीसह गवळयाच्या भकलेल्या राधेबरोबर लंपट होऊन त्यांच्या अशा पायथ्याशी लोळत पडतो"[२७] याप्रकारचे अनैतिक चाळे करणाऱ्या श्रीकृष्णास ईश्वर कसे म्हणावे ? गवळणीच्या चोळया व लुगडी बगलेत मारुन हा श्रीकृष्ण कदंब वृक्षावर मजा पहात असला हा निर्लज्जपणा निर्मिकास शोभतो काय ? अशाप्रकारे श्रीकृष्णांचीही टीकेच्या रुपाने जोतिरावांनी कुचेष्ठा केली असल्याचे आढळते.

जोतिराव फुले रामायण भागवतादि ग्रंथातील नीतिमत्तेवरही टीका करतात. रामायणातील असंभव घटनांची मालिका सांगून त्यावर आरोप करताना जोतिराव म्हणतात - रामायणातील सर्व इतिहास केवळ माकडचेष्टा असून त्यात नीतीचा लव आहे म्हणून आम्हास दाखवता येणार नाही.[२८] फुलेंच्या टीकेतून धर्मग्रंथसुध्दा सुटलेले नाहीत. त्यातील अतिशयोक्तीपूर्ण घटना व भोंगळपणा समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. गीतेतील श्रीकृष्णाने अर्जुनास केलेल्या कुतर्कभरीत उपदेशावरही फुल्यांनी टीका केली आहे. तोच उपदेश विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी, दासबोधासारख्या ग्रंथात प्राकृत भाषेत आणल्याने त्या ग्रंथांनाही फुले थोतांडी ग्रंथ म्हणून टीका करतात. जोतिराव फुल्यांना जेंव्हा एखाद्या ग्रंथामध्ये अथवा व्यक्तीमध्ये शूद्रांबाबत सहानुभूतीऐवजी तिरस्कारणीय विचारसरणी आढळते. तेव्हा ते त्या व्यक्तीवर अथवा ग्रंथातील विचारसरणीवर मग तो धर्मग्रंथ असला तरीही परखड टीका करतात. छत्रपती शिवाजीराजेंच्या राज्यारोहणप्रसंगी गागाभटादि ब्राह्मवृंदयाच्या धर्मांध भूलथापांना बळी पडलेल्या छत्रपती शिवाजीराजेंनाही फुले " अक्षरशून्य " म्हणून संबोधितात. जोतिराव

२१

फुल्यांनी ब्राह्मण्याबरोबर देवदेवतांवरही टीका केली. ज्या धर्मग्रंथातील तत्वप्रणालीमुळे आणि उच्चवर्णीयांच्या विचारसरणीमुळे शुद्रातिशुद्रांची पिळवणूक झाली त्या प्रत्येक घटकाबाबत जोतिरावांच्या अंत:करणात धगधगता संताप होता. म्हणूनच विशेषत: ब्राह्मण व त्याच्या ब्राह्मण्यावर जास्त प्रमाणात टीकेची झोड उठल्याचे आढळते. "परखडपणा" हे त्यांच्या अखंडादि काव्यरचनेचे वैशिष्टय प्रकर्षाने दिसून येते. त्यामुळे त्यातील काव्य-गुणांचा अभाव जाणवतो.

## अखंड प्रभावीपणा -

जोतिराव फुल्यांनी आपल्या मनातील भावनांचा अविष्कार साध्या सोप्या भाषाशैलीत उत्स्फूर्तपणे केला. त्यांची कविता म्हणजे मानवमुक्तीचे तत्वज्ञान मांडणारे "पद्य" होय. भालचंद्र फडके फुलेंच्या कवितेबाबत म्हणतात[२९]- "जोतिरावांच्या कवितेतील ओळी म्हणजे वैचारिक भूमिका मांडणारी विधानेच आहेत" विधनात्मक स्वरुपाच्या काव्यातून फुल्यांनी आपल्या मनातील विचार प्रभावीपणे मांडले आहेत.

मानवाचे धर्म नसावे अनेक ।
निर्मीक तो एक । जोती म्हणे ।।
जप अनुष्ठाने पाऊस पाडीती ।
आर्य का मरती जळवीण ।।
स्वभाषा लिहावी भाषण करावे ।
सद्गुणी असावे ।। स्वभावात ।।
आत्मपरिक्षणा तुम्ही द्यावा थारा ।
मच्छरा आवरा ।। जोती म्हणे ।।
सत्यावीण नाही जगी अन्यधर्म ।
करावे सावध ।। बंधूपरी ।।

यासारख्या त्यांच्या विधानात्मक पद्यरचनेतून विवेकवादाचा प्रभावी पुरस्कार होत असल्याचे जाणवते. शूद्रातिशूद्रांच्या पिळवटलेल्या असहाय्य, अगतिक, दुर्बल मनाचा टाहो फुल्यांच्या अंत:करणास जाणवत होता. त्यामुळे अस्वस्थ होऊन त्वेषाने त्यांनी सामाजिक दास्यावर परखड हल्ला केला. तोही तितक्याच प्रभावीपणे केला. म्हणूनच फुल्यांना तत्कालीन प्रतिकूल परिस्थितीत अनेक अनुयायी मिळाले. गोपाळ हरी देशमुख [लोकहितवादी] सारख्या फुलेंच्या समकालीन ब्राह्मण विचारवंतानी ब्राह्मण्य व त्यांच्या पोकळ अहंकारा-बद्दल तिरस्कार व्यक्त केला. महादेव गोविंद रानडे, भांडारकर, डॉ.घोले, कृष्णराव भालेकर यासारख्यांनी आपल्या सरकारी नोकरीबाबत तमा न बाळगता समाजप्रबोधन केले. भालेकरांनी तर डिस्ट्रिक्ट जज्जांच्या कोर्टातील कारकूनकी सोडली व फुल्यांचे कार्यात सक्रिय सहभाग घेतला. फुलेंच्या कार्याला गती यावी व त्यांचे विचार शब्दरूपाने सामान्य जनापर्यंत पोहोचावेत म्हणून " व्यंकू बाळाजी कालेकर" व "रामय्या व्यंकय्या अय्यांवारु" या मुंबईच्या तेलगू मंडळींनी समाजाला बाराशे रुपयांचा एक छापखाना देऊ केला."[30] या सर्व बाबींचा विचार करता फुल्यांच्या विचारांचा, काव्याचा समाजावर पडलेला प्रभाव लक्षात येतो.

आक्रमकता -

जोतिराव फुल्यांच्या काव्यातील प्रभावीपणाचे खरे यश त्यांच्या आक्रमकशैलीत आहे. सत्यपाठ, भटाची वाणी, ढोंगीगुरु, ब्राह्मणांचा भोंदूपणा यामध्ये उच्चवर्णीयाविरोधी फुल्यांची आक्रमक वृत्ती जाणवते. आपल्या अंत:करणातील पुरोहितशाहीबाबतचा आवेश त्यांनी बेडरपणे व्यक्त केला आहे.

जोतिराव फुल्यांचे विचार "अन्याय घडो कोठेही चिडून उठू आम्ही ।" या तत्वाचे होते. शूद्र लोकांच्या उध्दारासाठी त्यांना प्रचंड मोठा वर्णवर्चस्वा-विरुध्द लढा उभाकरावा लागला. यासाठी त्यांना दोन प्रकारे आक्रम भूमिका

धारण करावी लागली. उच्चवर्णीयांचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी घणाघाती हल्ला करणे व शूद्रांना गुलामगिरीची जाणीव करून देऊन स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी परखड भाषेत कान उघाडणी करणे. सर्वप्रथम फुल्यांनी "ब्राह्मणांचे कसब" सर्व समाजासमोर आक्रमकपणे मांडले. देवा-धर्माच्या नावावर समाजाची लुबाडणूक बंद होण्यासाठी त्यांनी धैर्याने समाजास सांगितले.

कल्पनेचे देव कोरीले उदंड ॥
रचीले पाखांड ॥ हितासाठी ॥
किंवा
स्वर्गाची शांतता कल्पून मनात ॥
लिहिली ग्रंथात ॥ तर्कबळे ॥

"धर्मग्रंथ" हे ब्राह्मणांनी बनविलेले "थोतांड" आहे. हे कटुसत्य समाजासमोर मांडले. शूद्रातिशूद्रांचा ज्या धर्मग्रंथातील तत्वामुळे छळ झाला तो ग्रंथच जाळून टाका असा संताप फुल्यांनी व्यक्त केला.

"मनु धिक्कारूनी ऐकीकडे फेका ॥" यासारख्या काव्यपंगतीतून त्यांची आक्रमक भूमिका लक्षात येते. शूद्रातिशूद्रांना फुल्यांनी केलेला उपदेशाही तितक्याच आक्रमकपणे केलेला आहे. पण हा बोध समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महान आहे.

बोधात्मकता -

जोतिराव फुल्यांनी समाजात समता, स्वातंत्र्य व बंधुभाव या मुल्यांची जोपासना करण्यासाठी अखंडादि काव्यरचनेतून महान स्वरूपाचा बोध दिला. फुल्यांच्या काव्यातील बोधात्मकतेबाबत कृ.प.देशपांडे म्हणतात. " त्यांच्या अखंडातील रचनेत विविध विषय आले असले तरी नीति, धीर, सहिष्णूता, सद्विवेक इत्यादी विषय उघड उघड बोधपर आहेत." [३१] लोकांनी आपल्या दुर्गणांचा

त्याग करून सत्यनिष्ठेने वागणे, नम्रता, सौजन्य, कृतज्ञता, प्रामाणिकपणा इ. गुणांचा अंगीकार करून दुस-यास उपद्रव न करता निस्वार्थी जीवन जगणे हीच खरी नीती होय. अशाप्रकारचा बोध स्पष्टपणे अखंडादि काव्यातून केला. धीर, समाधान, सहिष्णूता, सद्‌विवेक या सर्व दैविगुणांचे महत्व फुल्यांनी साध्या सोप्या पध्दतीने पटवून सांगितले. जोतिराव फुल्यांनी हा विवेकीपणाचा बोध जितक्या नम्रतेने सांगितला, तितक्याच कठोरपणे उच्चवर्णीयांच्या भोंदूगिरीवर टीका करून सत्याचरणाचा बोध दिला. यासाठी त्यांना पोवाडे, आरत्या, पद्यमय पत्रव्यवहार, स्फूट काव्य यासारख्या पद्य प्रकारांचा अवलंब करावा लागला.

काव्यशैली -
---------

जोतिराव फुल्यांची कविता चिंतनाच्या खोल डोहातून निर्माण झाली. समाजातील समूहमनाच्या वेदना व्यक्त करणारी, विषमतें-विरुध्द आग ओकणारी, उपदेशाचे डोस पाजणारी, विनयशील, तितकीच परखड व प्रभावी काव्यशैली फुल्यांच्या अखंडात आढळते. ज्या समाजाच्या उध्दारा-साठी फुल्यांना काव्यलेखन करावयाचे होते, त्यांना समजेल अशी त्यांच्याच ओठावरील साधी, सोपी ग्राम्य भाषा फुल्यांनी आपल्या काव्यात हेतुपुरस्सर आणली.

फुलेंची काव्यशैली प्रसंगापरत्वे विविधरूपे धारण करते. सामान्य-जनांना सत्याचरणास प्रवत्त करणारी लोकांसमोर आदर्श आचारसंहिता मांडणारी त्यांची शैली प्रथम अत्यंत विनयशील रूप धारण करते. आपल्या काव्यातून फुलेंनी धर्मऐक्याचे महत्व पटवून सांगून स्त्री दाक्षिण्यवृत्ती व्यक्त केली. तसेच आत्मपरिक्षणाचे महत्व सांगताना ते म्हणतात -

हेच खरे ज्ञान आत्मपरिक्षण ।
बुध्दीचे लक्षण जोती म्हणे ।

जोतिराव फुल्यांची काव्यशैली उच्चवर्णीयांचा दंभस्फोट करताना आक्रमक रूप धारण करते. ब्राह्मणांच्या सोंगाढोंगाचा खरपूस समाचार घेताना फुल्यांच्या अंगात जणू मूर्तिभंजकाचाचा संचार होतो. लोकांना भूलथापा देऊन कष्टाशिवाय येथेच्छ अन्न सेवन करण्याच्या त्यांच्या वृत्तीबाबत फुले म्हणतात -

> जास्ती खाता अन्न कुदर्पी ढेकर ।।
> येई तिरस्कार ।। घाण येता ।।
> गुदयंत्रातून              चा गजर ।।
> होई वारंवार बाजा परी ।।   [३२]

भटाभिक्षुकांच्या कर्मकांडाची रेवडी उडविण्यासाठी त्यांनी खूपच धारदार परखड काव्यशैलीचा अवलंब केला.

फुल्यांची काव्यशैली काही ठिकाणी संस्कारक्षम रूप धारण करते. त्यांच्या पद्यरचनेवर संतांच्या अभंगवाणीचे सांप्रदायिक भजनी पदांचे आणि शाहिरी कवनांचे संस्कार झालेले दिसून येतात.

आरती ज्ञानराजा । महाकैवल्य तेजा ।। या ज्ञानेश्वरावरील "रामाजनार्दनांच्या" सुप्रसिद्ध आरतीचे पडसाद - सेवुया सत्य राजा । महाप्रांजक तेजा ।। या आदिसत्याच्या आरतीत उमटलेले आढळतात. " इच्छा ब्राह्मण भोंदूची ।। मिथ्या धाव भटाची " या पदाची रचना "मर्जी देवाची देवाची । मिथ्या हाव मनाची" या "बल्लव कवींच्या" प्रासादिक पदाच्या धर्तीवर आहे. तर "येऊ द्या दया मना" हे "सयाजीरावांना" लिहिलेले पद्यमय पत्र "येऊ दे दया" या "देवनाथांच्या" प्रसिध्द पदाशी चालीपुरते नाते सांगते.[33] याशिवाय "रामजोशी" यासारख्या शाहिरांच्या काव्यशैलीचा प्रभाव फुल्यांवर पडला होता. त्यांच्या काव्यशैलीने पोवाडे, अभंग, आरत्या पद्यमय पत्र यासारखी विविध रूपे धारण केली आणि मनातील अस्सल कळवळा समाजासमोर मांडला.

शब्दरचना :

अखंडादि काव्यरचनेतील शब्द साधेसोपे सर्वसामान्यांना चटकन समजतील असे आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची क्लीष्टता आढळत नाही. समाजात रूढ असणारे सामान्यांच्या जीभेवरील ग्राम्य, अर्वाच्य, शब्दांचाही समावेश फुल्यांनी अखंडात केल्याने ही काव्यरचना ओबडधोबड वाटते. पण प्रभावी प्रकटीकरण आणि जनजागृती हे फुल्यांचे काव्यप्रयोजन यामुळे साध्य झाले आहे.

फुल्यांच्या अखंडादि काव्यात तत्कालीन रूढ शब्दप्रयोग वाक्प्रचारांचा विपुल प्रमाणातील समावेश आढळतो. या शब्दप्रयोगात ब्राह्मणावर केलेली गुण विशेषणांची खैरात प्रकर्षाने जाणवते. पातकी, पाखांडी, चांडाळ, लज्जाहीन, ब्रह्मराक्षस, दुर्गुणाची खाण, घाणीचे आगार, अगडबंब, शापाचे घर, अनाचारी, भिक्षुक, भूदेव, आर्यभंड, ग्रामराक्षस याबरोबरच फुल्यांनी तत्कालीन रूढ इंग्रजी शब्दांचा वापर अखंडात केला. उदा. पार्लमेंट, शेकहँड, न्यूजपेपर, बरांडी, न्याशनल सभा, लोकलफंड शेअर्स इ. समाजात सामान्यांच्या नित्य वापरातील वाक्प्रचारही फुल्यांच्या अखंड रचनेत दिसून येतात. उदा. पाताळी घालणे, गर्वाने फुगणे, हाणून पाडणे, स्वर्गी जाणे, नाकाने कांदे सोलणे, पोटाशी धरणे, देशोधडीला पाठविणे, मलाई खाणे, तुंबडी भरणे, लाळ घोटणे, डोईवर खापर फोडणे, यासारख्या वाक्प्रचारामुळेच त्यांचे काव्य सामान्यजनांशी जणू संवाद करत असल्याचे आढळते.

अश्लिल रचना -

जोतिराव फुल्यांनी संतापाच्या भरात जणू उच्चवर्णीयांवर शिव्यांची लाखोलीच वाहिली आहे.

भेटती मैना पोपट ।। जेव्हा जमती गटपट ।  
चुमण घेती मटमट ।। मेरी तुंबडी भर दे ।। [३४]

यवनी रंभा हे पाळीती ।। भ्रष्ट मांगास म्हणाती ।
वेश्यांचे चुंबन घेती ।। शुद्रा पादोदका देती । [३५]
पशूतील भट अश्वलीद खाती ।
कुल्ली करती जोती म्हणे ।। [३६]

अखंडादि काव्यातील शब्दरचनेबाबत सुक्ष्मावलोकन केल्यास काव्यातील ओबडधोबडपणा चटकन जाणवतो. पण याबरोबरच त्यामागील फुल्यांचा धगधगता संताप दिसून येतो.

अलंकारीता -

अखंडादि काव्यातील शब्दरचना संतकाव्याप्रमाणे विशेषत: ज्ञानदेवाच्या ओवीसारखीच आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतील ओवीरचना साडेतीन चरणी केली.

उदा : म्हणोनि कुळजाति वर्ण ।
हे अवघेचि गा । अकारण ।
एथ अर्जुना माझेपण ।
सार्थक ऐक । [३७]

जोतिराव फुल्यांनी मात्र अखंडादि काव्यात ब-याच प्रमाणात ज्ञानेश्वरांच्या ओवीसारखी पण"अडीच चरणी" रचना केली. त्यांची इतर काव्यरचना [आदिसत्वाच्या आरत्या, दस्यूचा पोवाडा, ब्रह्ममय पत्र, स्फूटरचना] थोडयाफार फरकाने वेगवेगळी रुपे धारण करताना जाणवते. या काव्यरचनेत फुल्यांनी अगदी सहजपणे रुपकादि अलंकारांचा, काही दृष्टांताचाही समावेश केला आहे.

असंतोष राजा मच्छर प्रधान ।।
शिपाई दुर्जन । कडी कोट ।।
अज्ञानी रयत दारुबाज करी ।।
तंटा घरी दारी ।। सुख नाही ।। [३८]

यासारख्या रूपकातून तसेच -

कमळपात्रास उदक डागीना ।
कृष्णाजी होईना देवबाप्पा ।
किंवा
सुईच्या आग्रावर मोहरी थांबेना ।।
ब्राह्मण होईना । सत्कर्मी ।।

यासारख्या सहजसाध्य दृष्टांत रचनेमुळे अखंडादि काव्य अधिकच प्रभावी वाटते. त्याचप्रमाणे इराणी आर्यांनी केलेल्या शुद्रातिशुद्रांच्या कत्तलीचेही वर्णन फुल्यांनी करूणरसात्मक शैलीत केले आहे. पण फुल्यांनी आपल्या काव्यात अलंकार रसाविष्काराचे अवडंबर माजविलेले नाही.

## स मा रो प -

जोतिराव फुल्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे बारकाईने निरिक्षण केले. धर्मतत्वे, रुढी, परंपरांचा अभ्यास केला. समाजात शुद्रांना पशूवत जीवन जगावे लागत होते. खुद्द फुल्यांनाही अगदी पूर्वजांपासून याच दाहक यातनांनी चटके दिले होते. अर्थातच शुद्रांतिशुद्रांची या दास्यातून मुक्तता करणे या ध्येयाच्या साक्षात्काराने फुले बेभान झाले. यासाठी हजारो वर्षे चालत आलेल्या वर्णवर्चस्वास त्यांना सुरुंग लावायचा होता. त्यांनी निकराने हा लढा चालू ठेवला. संतवाङ्‌मयाच्या अभ्यासाने ते प्रभावित झाले. संतवाङ्‌मयातील अध्यात्मिक तेजामुळे जे सामर्थ्य महात्मा जोतिबा फुले यांच्या ठाई निर्माण झाले, त्या सामर्थ्याचाच हा अधिक प्रभावी असणारा तेजस्वी अविष्कार कठोर प्रहार करणारा ठरला. तरी तो नाकारता आला नाही. कारण त्याला वास्तवाची डूब होती. शुद्रांतिशुद्रांच्या दबलेल्या मनास जागृत करण्यासाठी अभंग सादृष्य "अखंडादि" काव्यरचनेचे त्यांना साधन सापडले.

त्यांच्या काव्यरचनेत अतिपरखाडपणा अर्वाच्यपणा साधी सोपी ओबडधोबड रचना असल्याने तत्कालीन सुशिक्षित-वर्गात त्यांचे काव्य प्रतिष्ठा पाऊ शकले नाही. पण त्या साध्या सोप्या ओबडधोबड काव्यशैलीने हजारो वर्षे बदलेल्या मनाला फुंकर घालून जागृत केले आणि वर्णवर्चस्वाविरूध्द प्रचंड मोठा ऐतिहासिक संघर्ष केला. यातच त्यांच्या काव्याचे खरे श्रेय आहे.

.....

## संदर्भ सूची


१ प्रभाकर वैद्य — म.फुले आणि त्यांची परंपरा (प्रेरणा, शिक्षण, विपर्यास) आ.१, मुंबई ४, १९७४, पृ.२४६

२ तत्रैव - पृ.252

३ आचार्य चतुरसेन — भारत मे इस्लाम आ.१, दिल्ली ६, १९७१, पृ.३२५

४ यशदत्त शर्मा — कबीर साहित्य और सिध्दांत आ. १, हरियाणा १४, १९८४, पृ.४९

५ प्रो.पुष्पपालसिंह — कबीर ग्रंथावली सटीक आ.४, दिल्ली ६, पृ.४९

६ तत्रैव - पृ.४९

७ तत्रैव - पृ.०५

८ डॉ.शं.गो.तुळपुळे — पाच संतकवी आ.३, पुणे-३०, पृ.२४१

९ डॉ.शं.दा.पेंडसे — भागवतोत्तम संत एकनाथ आ.2, पुणे-३०, पृ.०७

१० तत्रैव - पृ.२४५

११ विष्णुबुवा जोग महाराज — सार्थ तुकारामाची गाथा आ.३, मुंबई ४, १९७४, पृ.११०

१२ तत्रैव - पृ.१४५

१३ सी.वा.पेंडसे — रसतरंगिणी आ.४, बडोदे, १९२५, पृ.७२

१४ गो.म.कुलकर्णी — महाराष्ट्राची सत्यधारा
आ.१,पुणे-२, १९८१,पृ.१८०

१५ शं.गो.तुळपुळे — उनि.पृ.१८९

१६ डॉ.शं.दा.पेंडसे — महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास
अ.४,पुणे-३०, १९६५,पृ.१८१

१७ सं.गो.तुळपुळे — उनि पृ.४०५

१८ दीनबंधु — १६ डिसेंबर, १८९४,पृ.३

१९ तत्रैव — २४ फेब्रुवारी १८८५ ,प्र.अंक ८वा, पृ.२

२० तत्रैव — १९ जुलै १८८६, अंक २८वा, पृ.३

२१ सीताराम रायकर(संपा.) — कृष्णराव भालेकर समग्रवाङ्.मय
आ.१,पुणे-२,पृ.४६

२२ डॉ.सुमंत मुरंजन — पुरोहित वर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास (प्रस्तावना)
आ.१,वाई १९७३,पृ.०१.

२३ गंगाधर पानतावने — पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर
आ. —, नागपूर २२,पृ.१०.

२४ डॉ.स.ग.मालशे — महात्मा फुले - समग्रवाङ्.मय
आ.१,मुंबई-३२,पृ.६३,१९६९.

२५ तत्रैव - पृ.४९१

२६ चिं.ग.ओक — जोतिराव फुले कार्य व वाङ्.मय यांचे सत्यरुप दर्शन
आ.१,पुणे-३०, १९८४,पृ.४३.

२७ डॉ.स.ग.मालशे
श्री धनंजय कीर (संपादक) — उनि.पृ.३७१

२८ तत्रैव - पृ. १७९

२९ पी.बी.साळुंखे (संपा.) म.फुले गौरवग्रंथ

आ. १, मुंबई ३२, १९८२, पृ. ५१५

३० सिताराम रायकर (संपा.) उनि.पृ.७

३१ डॉ.कृ.प.देशपांडे अग्निफुले

आ. १, पुणे-३०, १९८२, पृ. १०९

३२ डॉ.स.ग.मालशे उनि.पृ.४८३
धनंजय कीर (संपा.)

३३ पी.बी.साळुंखे (संपा.) उनि.पृ.६६७

३४ डॉ.स.ग.मालशे उनि.पृ.४७८
धनंजय कीर (संपा.)

३५ तत्रैव - पृ.४७८

३६ तत्रैव पृ.४७३

३७ सी.वा.पेंडसे उनि.पृ.६

३८ डॉ.स.ग.मालशे उनि.पृ.४६२
धनंजय कीर (संपा.)


••